


RNI NO. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

किंमत ४ रु/-

वर्ष १ ले | अंक ९० वा | मंगळवार १५ ऑगस्ट २०२३ | पाने ४

Volume 1 | Issue 90 | Date : 15/08/2023 | blow : Tuesday | Page 4 | Price 4


# भारत ही लोकशाहीची जननी

## राष्ट्रपती मुर्मू यांचे देशाला उद्देशून भाषण; शेतकरी ते चांद्रयान मोहीमेवर भाष्य

नवी दिल्ली : स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला (१४ ऑगस्ट, २०२३), राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाला संबोधित केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या भाषणात शेतकरी ते चांद्रयान मोहीम अशा विविध मुद्यांना स्पर्श केला. भारत ही लोकशाहीची जननी आहे, त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा आपल्यासाठी अभिमानाचा दिवस असल्याचे त्यांनी म्हटले.

राष्ट्रपती मुर्मू यांनी म्हटले की, , स्वातंत्र्य दिन आपल्याला याची आठवण करून देतो की आपण केवळ व्यक्ती नाही तर आपण एका महान समुदायाचा भाग आहोत जो आपल्या प्रकारचा सर्वात मोठा आणि जीवंत समुदाय आहे. हा जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील नागरिकांचा समुदाय आहे. जात, पंथ, भाषा, प्रदेश याशिवाय आपली



एक ओळख आपल्या कुटुंबाशी आणि कार्यक्षेत्राशी निगडित आहे. पण आपली एक ओळख आहे जी या सगळ्यांच्या वर आहे आणि ती म्हणजे आपली ओळख म्हणजे भारताचे नागरिक. आपण सर्व या महान देशाचे नागरिक आहोत. आपल्या सर्वांना समान संधी आणि अधिकार आहेत आणि आपली कर्तव्ये देखील समान असल्याचे राष्ट्रपतींनी म्हटले.

राष्ट्रपती म्हणाले, गांधीजी आणि स्वातंत्र्य लढ्यातील इतर महान नायकांनी भारताच्या आत्म्याला जागृत केले आणि आपल्या महान सभ्यतेची मूल्ये जनसामान्यांपर्यंत पोहोचवली. सत्य आणि अहिंसा हा आपल्या स्वातंत्र्य लढ्याची आधारशिला आहे. जगातीलन अनेक राजकीय संघर्षांमध्ये यशस्वीपणे अहिंसा आणि सत्य हे मूल्य स्वीकारले गेले असल्याचे त्यांनी म्हटले. । पान २ वर

## देशाचा आज ७७वा स्वातंत्र्यदिन

### पंतप्रधान मोदी लाल किल्ल्यावरुन सलग दहाव्यांदा संबोधित करणार



नवी दिल्ली : भारतमातेला पारतंत्र्याच्या बेडीतून अनेक शूर पुत्रांनी इंग्रज राजवटीविरोधात लढा देत आपल्या प्राणाची आहुती दिली होती. याच बलिदानाच्या जोरावर १४ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्याला इंग्रजांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळाले. पुन्हा एकदा या हुतात्म्यांना स्मरण करण्याचा पवित्र सण म्हणजेच स्वातंत्र्यदिन आज साजरा होत आहे. संपूर्ण देश स्वातंत्र्यदिनाच्या रंगात रंगला आहे. ७७ व्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याची दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावर तयारीही पूर्ण झाली आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ध्वजारोहण करतील आणि देशाला संबोधित करतील.

**लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाचं वेळापत्रक–**

सकाळी ६.५५ – संरक्षण सचिव पोहोचतील, सकाळी ६.५६ ते ७ – सीडीएस आणि तिन्ही सेना प्रमुखांचे आगमन होईल , सकाळी ७.०६ – पंतप्रधान राजघाटावर पोहोचतील आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना पुष्पहार अर्पण करतील. , सकाळी ७.०८ – संरक्षण राज्यमंत्री येतील, सकाळी ७.११ – संरक्षण मंत्री राजनाथ सिंह येणार, सकाळी ७.१८ – पंतप्रधानांचे लाल किल्ल्यावर आगमन आणि त्यानंतर पंतप्रधानांना तिन्ही दलाकडून गार्ड ऑफ । पान २ वर

## स्वातंत्र्यदिनी ९५४ पोलिसांना पदके; महाराष्ट्रातील ७६ पोलिसांचा समावेश

मुंबई : केंद्र सरकारकडून स्वातंत्र्यदिनी विविध केंद्रीय आणि राज्य दलातील एकूण ९५४ पोलीस कर्मचाऱ्यांना सेवा पदके जाहीर केली आहेत. देशभरातील २३० जवानांना पोलीस पदक प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये शौर्यासाठी राष्ट्रपती पोलीस पदकाचाही समावेश करण्यात आला आहे.



स्वातंत्र्यदिनी आणि प्रजासत्ताक दिनानिमित्त वर्षातून दोनदा ही पदके जाहीर केली जातात. महाराष्ट्रातील ७६ पोलिसांना पदके जाहीर झाली असून त्यातील ३ पोलीस अधिकाऱ्यांना 'राष्ट्रपती पोलीस पदक' तर, ३३ पोलिसांना 'पोलीस शौर्य पदक' आणि ४० पोलिसांना 'पोलीस पदक' जाहीर करण्यात आले आहे. राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक प्रवीण साळुंके, पिंपरी–चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती, जयंत नाईकनवरे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले आहे. तसेच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी प्रवीणकुमार पडवळ (पोलीस सहआयुक्त, मुंबई शहर), विजय पाटील (पोलीस उप महानिरीक्षक, एसीबी,मुंबई) आदींना राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात येणार आहे. सीआरएफ अधिकारी लौक्राकपम इबोमचा सिंग यांना राष्ट्रपती । पान २ वर

## हिमाचल प्रदेश भूस्खलन दुर्घटना: ५० जणांचा मृत्यू, २० जण अडकल्याची भीती



हिमाचल प्रदेश : मागील २४ तासांत उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये जोरदार पाऊस कोसळला आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे हिमाचल प्रदेशमध्ये सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. पावसाशी संबंधित विविध घटनांमध्ये हिमाचल प्रदेशात आतापर्यंत ५० जणांचा मृत्यू झाला आहे. अजून २० लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. संबंधित लोकांना वाचवण्याचं काम सुरू आहे.

राज्यात मुसळधार पाऊस सुरूच असून हिमाचल प्रदेशमध्ये पावसाशी संबंधित विविध दुर्घटनांमध्ये किमान ५० लोकांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी दिली. तसेच शेजारच्या उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसामुळे भूस्खलन झाले, पूल वाहून गेले, शैक्षणिक संस्था बंद पडल्या आणि नद्यांच्या पाण्याची पातळी वाढली असल्याचंही त्यांनी सांगितलं.मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितलं की, सोमवारी भूस्खलन होऊन । पान २ वर

## नबाव मलिक दीड वर्षानंतर तुरुंगाबाहेर

मुंबई : राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांची तुरुंगातून दोन महिन्यांच्या जामीनावर सुटका झाली असून त्यासंबंधी मुंबई सत्र न्यायालयात जामिनाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. क्रिटी केअर रुग्णालयाबाहेर नवाब मलिकांच्या समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. प्रकृतीचं कारण देत वैद्यकीय जामीन मिळावा अशी याचिका नवाब मलिक यांनी केली होती. मलिकांची ही मागणी सुप्रीम कोर्टाने गेल्या आठवड्यात मान्य केली होती. गोवावाला कंपाऊंडमधील मनी लाँडरिंगप्रकरणी नवाब मलिकांना ईडीने २३ फेब्रुवारी २०२२ ला अटक केली होती.प्रकृतीच्या कारणास्तव पुढील दोन महिन्यांसाठी राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिकांना जामीन मिळाला आहे. नवाब मलिक यांची तब्बल एक वर्ष पाच महिन्यांनी जेलमधून सुटका



झाली आहे. नवाब मलिक मूत्रपिंडाच्या उपचारांसाठी कुर्ला क्रिटी केअर रुग्णालयात दाखल होते. मलिकांच्या सुटकेची बातमी कळताच त्यांचे कार्यकर्ते रुग्णालय परिसरात जमले होते. तर दुसरीकडे खासदार सुप्रिया सुळेदेखील मलिकांच्या सुटका झाल्यानंतर रुग्णालयात भेटीसाठी पोहोचल्या होत्या. यावेळी मलिकांच्या कार्यकर्त्यांनी ढोल–ताशे वाजवून सुटकेचा जल्लोष केला. सर्वोच्च न्यायालयातून जामीन मिळाल्यानंतर मुंबई सत्र न्यायालयात अटी आणि शर्तींची । पान २ वर



स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर विठुराया आणि रखुमाई तिरंग्यात रंगले!

## स्वातंत्र्यदिनी दिल्लीत कडक सुरक्षा व्यवस्था

### १० हजार पोलीस तैनात, कॅमेऱ्यांद्वारे चेहऱ्याची ओळख

नवी दिल्ली : मंगळवारी १५ ऑगस्ट) भारत ७७ वा स्वातंत्र्य



दिन (Independence Day 2023) साजरा करणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यासाठी राजधानी दिल्लीत कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. देशाची राजधानी सुरक्षित राहावी आणि लोकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी तब्बल १०,००० हून अधिक पोलीस संपूर्ण शहरात तैनात केले जातील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. याशिवाय इतर अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात येणार आहे.

**१०,००० पोलीस तैनात** पोलिस उपायुक्त जनसंपर्क अधिकारी सुमन नलवा यांनी । पान २ वर



## गोगांव ग्रामपंचायतच्या वतीने स्वतंत्र सैनिक व माजी सैनिकाचे सन्मान

### स्वातंत्र सैनिक महादेव गायकवाड हस्ते शीला फलकाचे उद्घाटन

अक्कलकोट/प्रतिनिधी : ग्रामंचायत गोगावच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महत्सवानिमित्त राष्ट्रीय ध्वजारोणाचा कार्यक्रम कलेश्वर देवस्थान ट्रस्ट उपाध्यक्ष निवृत्ती सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला, यावेळी स्वातंत्र्य सैनिक महादेव गायकवाड यांच्या हस्ते शिला फलकाचे उद्धाटन करण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, ज्येष्ठ सदस्य प्रदीप जगताप, शरणपा कलशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. मेरी मिट्टी मेरा देश अभियाना अंतर्गत गावातील माझी सैनिक, स्वातंत्र्य सैनिक, यांचा सत्कार करण्यात आला, व शिला फलकांचा अनावरण करण्यात आला, त्यानंतर वृक्षारोपण करण्यात आले. त्या प्रसंगी प्रमुख उपस्थित मुख्याध्यापक दयानंद चोळे, डॉ लिंगराज नडगेरी, पुंडलिक वाघमारे, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, आरोग्यसेविका अंबिका वळसंग, अंगणवाडी सेविका तेजाबाई गुरव, भाग्यश्री सोनकवडे, व ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## विधानभवनावरील विद्युत रोषणाई प्रणालीचे लोकार्पण

नागपूर : विधानभवन इमारतीवर नव्याने तयार करण्यात आलेल्या कायमस्वरूपी विद्युत रोषणाई प्रणालीचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले.





उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी येथील विधानभवन परिसरात भेट देवून सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे विधानभवन इमारतीच्या दर्शनी भागात करण्यात आलेल्या विद्युत रोषणाई व सजावटीची पाहणी केली. विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, आमदार प्रवीण दटके व कृष्णा खोपडे यावेळी उपस्थित होते.

विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी विदर्भाला न्याय देण्यासाठी नागपूरच्या विधानसभा इमारतीचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. १९१२ ते ९१४ या कालावधीत पूर्ण करण्यात आलेल्या या इमारतीत १९२० मध्ये भारतातील लोकांना प्रतिनिधीत्वाचा अधिकार देण्यासाठी विधानपरिषदेच्या सदस्याची पहिली सभा तसेच १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्रातील पहिले अधिवेशन याच इमारतीत झाल्याचे त्यांनी सांगितले. कायमस्वरूपी विद्युत रोषणाईच्या माध्यमातून या सुंदर इमारतीचे सौंदर्य अधिकच वाढले आहे. नागपूरप्रमाणेच मुंबईच्या विधानभवनात देखील अशीच आकर्षित रोषणाई करू असे त्यांनी सांगितले. नागपूर विधानभवन इमारतीच्या विस्तारीकरणासाठी शासनाकडून पुढाकार घेण्यात आला असून लवकरच नवीन विधानसभेची विस्तारीत इमारत दिसून येईल, असेही ते म्हणाले.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता हेमंत पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विविध रंगछटेच्या विद्युत रोषणाईसाठी जिल्हा नियोजनच्या

विकास निधीतून एक कोटी सात लक्ष रूपयात हे काम पुर्ण करण्यात आले आहे. यात आंतरराष्ट्रीय वैशिष्ट्यांचा वापर करण्यात आला असून विशिष्ट प्रणालीद्वारे या रंगछटा देशाच्या कोणत्याही भागातून नियंत्रीत करता येत असल्याचे त्यांनी सांगितले.याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या हस्ते विद्युत रोषणाईचे काम पूर्ण करणाऱ्या अभियंत्यांचा सत्कार करण्यात आला.विधानभवन परिसरात रोषणाईमुळे उजळून निघालेला परिसर पाहण्यासाठी नागरिकांनाही मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

## * सुविचार *

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

# एक पाऊल अर्थ प्राप्तीच्या दिशेने

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात विकासाची चक्रे झपाट्याने फिरत आहेत. देशातील ५०८ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास हा त्यातील एक भाग आहे. ज्या ज्या ठिकाणी रेल्वे स्थानके आहेत तेथे कमी-अधिक प्रमाणावर सुविधा आहेत. त्यात अधिक भर टाकण्याचा प्रयत्न होत आहे. रेल्वे स्थानकांचा विकास हे एक त्यापुढील पाऊल आहे. रेल्वे स्थानकांवर विविध प्रकारच्या सुविधा निर्माण करणे आणि त्याचा प्रवाशांना लाभ पोहोचविणे हे सरकारचे कामच आहे, हीच भावना मोदी सरकार पार पाडत आहेत. रेल्वे स्थानक केवळ भकास अवस्थेतील केंद्र न बनता विकास आणि प्रसन्नतेचे केंद्र बनले पाहिजे ही त्यामागील भावना आहे. भले यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असला तरी तो देशातील लोकांसाठी अथवा प्रवाशांसाठी होत आहे, ही एक समाधानाची बाब आहे. 'अमृत भारत स्टेशन' पुनर्विकास योजना असे या नव्या योजनेचे नाव असून देशभरातील ५०८ स्थानकांचा या योजनेमुळे कायापालट होणार आहे. अलीकडे मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. जवळपास २५ हजार कोटी रुपयांची ही योजना पूर्णत्वास जाण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सोलापूरसह ४४ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. या अमृत भारत रेल्वे स्थानक पुनर्विकास योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारच्या सोयी-सुविधा निर्माण करून देत असताना देशात आज अनेक रेल्वे स्थानकांची अवस्था खराब आहे. त्याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. शिवाय जेथे रूळ वाकडे झाले, दबले असल्यास ते बदलणे, फिश प्लेट बदलणे, ओव्हर हेड वायरकडे लक्ष देणे, सिग्नल यंत्रणा मजबूत करण्यावर भर देऊन होणारे अपघात टाळावे लागतील. जुनाट रेल्वे रूळ बदलावे लागतील. कारण जुन्या रुळांची समस्या गेल्या कित्येक वर्षांपासून रेल्वे प्रशासनाला भेडसावत आहे. त्यादृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. देशातील प्रवाशांची सुरक्षितता सर्वात महत्त्वाची असून त्यांना सुरक्षित आणि सुखद प्रवासाचा विश्वास द्यावा लागणार आहे. असे सर्व केले तरच रेल्वे विभाग ज्या काही सुविधा प्रवाशांना निर्माण करून देत आहे, त्याला एक अर्थ प्राप्त होईल.

पान १ वरुन

## भारत ही लोकशाहीची..

राष्ट्रपती मुर्मू म्हणाले की, आज महिला देशाच्या विकास आणि सेवेच्या प्रत्येक क्षेत्रात भरीव योगदान देत आहेत आणि देशाचा अभिमान वाढवत आहेत. आज आपल्या महिलांनी अशा अनेक क्षेत्रात विशेष स्थान निर्माण केले आहे ज्यात त्यांच्या सहभागाची काही दशकांपूर्वी कल्पनाही केली जात नव्हती. महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देण्याचे आवाहन राष्ट्रपतींनी देशाला केले.

देशाला उद्देशून केलेल्या भाषणात राष्ट्रपती मुर्मू यांनी म्हटले की, देशाने संकट, आव्हानांचे रुपांतर संधीत केले आहे. देशाने जीडीपीमध्ये चांगली वाढ केली आहे. अन्नदाता शेतकऱ्यांनी आपल्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देश शेतकऱ्यांचा ऋणी असल्याचे त्यांनी म्हटले.

आदिवासींची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना प्रगतीच्या प्रवासात सामावून घेण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. मी माझ्या आदिवासी बंधू-भगिनींना आवाहन करतो की, तुम्ही सर्वांनी आपल्या परंपरा समृद्ध करताना आधुनिकतेचा अंगीकार करा. गरजूंना मदत करण्यासाठी विविध क्षेत्रात पुढाकार घेण्यात आला असून कल्याणकारी कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवले जात आहेत.

राष्ट्रपती मुर्मू यांनी म्हटले की, भारत संपूर्ण जगात विकासाची उद्दिष्टे आणि मानवतावादी सहकार्याला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सहकार्याला चालना देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत आहे. भारताने आंतरराष्ट्रीय मंचांवर आघाडीचे स्थान निर्माण केले आहे आणि ऋ२० देशांच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही स्वीकारली आहे. ऋ२० जगाच्या लोकसंख्येच्या दोन तृतीयांश लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करत असल्याने, आमच्यासाठी जागतिक प्राधान्यक्रमांना योग्य दिशेने नेण्याची ही एक अनोखी संधी आहे.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था नवीन उंची गाठत आहे आणि नवे आयाम प्रस्थापित करत असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात काढले. चंद्राच्या कक्षेत प्रवेश केलेले चांद्रयान ३ इस्रोने प्रक्षेपित केले आहे. चंद्रावरची मोहीम आपल्या अंतराळातील भविष्यातील कार्यक्रमांसाठी फक्त एक पायरी आहे, आपल्याला अजून बराच पल्ला गाठायचा असल्याचेही त्यांनी सांगितले.

# स्वातंत्र्य दिन साजरा करताना..

१५ ऑगस्ट १९४७ साली जुलमी, लुटारू व एकमेकांत फुट पाडून सर्वसामान्य जनतेवर अन्याय करणाऱ्या ब्रिटिश राजवटी पासून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. या स्वातंत्र्य लढ्यात अनेक ज्ञात अज्ञात क्रांतीकारकांच्या जिवाचे दानही गेले. जिवाची व जवानीची काळजी न करता अन्याय हत्याचार व जूलुमांविरोधात भगतसिंग, राजगुरू सुखदेव या सारख्या जवांनानी स्वतः च्या जिवाची पर्वा न करता हसत हसत फासावर गेले, अशपाक उल्ला खान सारख्या तरुणांचे जिवन देशहितासाठी अर्पित झाले. या खऱ्या स्वातंत्र्यविराच्या बलीदानामुळेच तर ब्रिटिश सरकारला नमते घेऊन शेवटी देश सोडून जावे लागले. १५ ऑगस्ट १९४७ साली ब्रिटीशांनी भारत देशाची भौगोलिक भुमी भारतीयांकडे देऊन यापुढे भारत देशासोबत केवळ मैत्रीपुर्वक संबध असतील असे जाहीर करून १५ ऑगस्ट १९४७ ला तत्कालीन भारतीय ध्वज फडकवून स्वातंत्र्याचा आनंद साजरा केला गेला. देशाच्या माती साठी सांडलेल्या रक्ताला न्याय मिळाला. भागतसिंग, सुखदेव, राजगुरू, अशपाक उल्ला खान सारख्या क्रांतीकारकांच्या प्रयत्नायाचे चित झाले. ब्रिटिश सत्ता गेली त्याचा हा आनंदोत्सव आपण १५ ऑगस्ट १९४७ पासून दररोज साजरा करतो. आणि स्वातंत्र्य लढ्यातील शहीदांना आपण आदरांजली वाहतो.



आदरांजली वाहुन त्यांच्या कार्यावर त्यांच्या जिवनावर वेगवेगळ्या बाजुने बोलले जाते. त्यांचे द्रेशप्रेम व देशाला स्वातंत्र्य करण्याची तळमळ बेंबीच्या देठापासून सांगितली जाते. परंतु ज्या उद्देशासाठी भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, अशपाक ऊल्ला खान सारखे तरुण शहीद झाले. त्या शहीदांच्या आठवणीवर केवळ १५ ऑगस्ट ला च भावनिक होणे हा देशद्रोह नाही का? स्वातंत्र्य दिन साजरा करताना देशासाठी जिवाची बाजी लावणाऱ्या शहीदांच्या विचाराचा, आचाराचा आपण भारत घडवू शकलो का? यावर समिक्षा कधी करायची? १५ ऑगस्ट ला भावनिक होऊन भाषण देऊन राष्ट्रभक्ती दाखवणारे वर्षे भर किती राष्ट्रहीताच्या गोष्टी करतात यावर हे ही तपासने आवश्यक आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाच्या भौगोलिक सिमांना स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी १९५० ला मानसाला स्वातंत्र्य मिळाले. आणसाला माणसाप्रमाणे सन्मानाने जगता यावे, सार्वजनिक ठिकाणी जाता यावे, खाता यावे, स्वतः चे मत व्यक्त करता यावे, सार्वजनिक ठिकाणच्या पाणवठ्यावर सर्वांना जाता यावे अशा गोष्टी साठी भारतीय संविधानामध्ये तरदुती करून माणवाला स्वातंत्र्य द्यावे लागले. याचाच अर्थ माणुस किती गुलामीमध्ये याची जाणीव होते. ब्रिटिश भारतावर एकाधिकारशाहीने राज्य करतात, व्यापाराच्या नावाखाली जनतेची लुट करतात, भारतातीलच सैन्य भारतीय लोकांच्या विरोधात वापरतात आणि हे आम्हाला नको आहे म्हणून ब्रिटीशापासुन आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे. आणि जिवाची पर्वा न करता या लुटारू व अन्यायकारी ब्रिटीशापासुन भारताला स्वातंत्र्य करून भारतीय लोकांना सुखी करण्यासाठी सुभाषचंद्र बोस सारख्या तरुणाने तुम मुझे खुन दो मै तुम्हे आझादी दुंगा म्हणत सरळ सरळ रक्त सांडल्या शिवाय ब्रिटिश अन्याय कारी सरकार झुकणार नाही म्हणून अनेकांनी आपले रक्त सांडवले, देशातील प्रत्येक काना कोपऱ्यात क्रांतीकारकाचे रक्त सांडलेले आहे. आणि म्हणून स्वातंत्र्य दिन साजरा करताना त्या रक्ताची आम्हाला कींमत आहे का याचा ही विचार स्वातंत्र्य दिनी व्हायला पाहिजे. ब्रिटिश भारताला लुटत होते म्हणून आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे होते. ब्रिटीश अधिकारी अन्याय अत्याचार करत होते म्हणून आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे तर स्वातंत्र्या नंतर भारतीयांची लुट थांबली का? स्वातंत्र्यानंतर अन्याय अत्याचार थांबले का? ब्रिटिश वाईट होते परकीय होते म्हणुन रक्त सांडवून त्यांना पळवून लावले. परंतु स्वातंत्र्याच्या आणि राष्ट्रप्रेमाच्या गप्पा करणारे लोक राष्ट्र व राष्ट्रीय हित या विषयी गंभीर आहेत का? ब्रिटीशांनी फोडा आणि राज्य करा चे धोरण राबवून देशात फुट पाडली व सत्ता भोगली. मग सध्याचे सरकार नेमके काय करते? हिंदु मुस्लिम वाद घडवून आणुन राजकीय पोळी भाजली जाते. हे नाकारून स्वातंत्र्यदिन साजरा करणे म्हणजे शहिदांच्या विचाराशी व त्यागाशी द्रोह करणे होय. ब्रिटिशांनी देशाला लुटले व त्यांचे नोकर बनवण्यासाठी, त्यांच्या फायद्यासाठी का होईना शाळा, नोकरी निर्माण केली, रेल्वे, टपाल, निर्माण करून प्राथमिक सुविधा दिल्या, परंतु भारतीय राज्यकर्त्यांनी लुट तर केलीच परंतु मुलभूत सुविधा देखील कमी केल्या. म्हणजे एकीकडे स्वातंत्र्य दिन साजरा करून मी किती राष्ट्रभक्त आहे हे दाखवून दुसरीकडे मात्र लोकांची लुट होताना, मुलभूत सुविधा न मिळताना, मानवी स्वातंत्र्यावर बंधने येताना, जातीय दंगली मध्ये सर्व सामान्य तरुणांवर गुन्हे दाखल होताना, पंधरा ऑगस्ट ला राष्ट्रभक्ती अंगात आणणारे लोक जातात तरी कुठे? स्वातंत्र्य लढ्यात शहीद झालेल्या शहिदांना केवळ ब्रिटीशांनी देश सोडून जावे एवढेच वाटत नव्हते तर देशात लुट होणार नाही, देशात कोणावर अन्याय अत्याचार होणार नाही आणि आम्ही भारतीय लोक सुखी समाधानाने राहु या साठी त्यांचा लढा होता. परंतु आज राज्यकर्त्येच हिंदु मुस्लिम द्वेष पसरवून माणसामाणसा भेद करतात अशा लोकांना ब्रिटीशांनी आम्हाला फोडून राज्य केले असं बोलण्याचा तरी नैतिक अधिकार आहे का? स्वातंत्र्य भारतात प्रत्येक नागरिकांना शिक्षण, नोकरी व आरोग्य सुविधा मिळायला पाहिजे अशी कायदेशीर तरतूद असताना ही ते मिळते का? मनीपुर मध्ये महिलांना बलात्कार करून नग्न धिंड काढली जाते, नांदेड मध्ये भिम जयंती साजरी केली म्हणून हत्या केली जाते, मुबंई मध्ये महिलेची हत्या करून कुकर मध्ये शिजवून मिक्सर मध्ये बारीक केले जाते, लैंगिक अत्याचाराच्या विरोधात आंतरराष्ट्रीय पातळीवर महिला खेळाडूंना न्यायासाठी रस्त्यावर बसावे लागते, आणि सरकार तेथील लाईट, पाणी बंद करून जागतिक पदके मिळवलेल्या खेळाडूंना खाली पाडून तुडवले जाते. शेतकरी फासावर लटकतो, फि भरायला पैसे नाही म्हणून आई आत्महत्या करते कारण आत्महत्या केल्यावर सरकार काही मदत माझ्या मुलाला करेल हे सर्व स्वतंत्र भारतात घडते. राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा मान्य नसणाऱ्याला पोलीस संरक्षण दिले जाते. राष्ट्रपतींना मंदीराच्या गाभाऱ्यात जाता येत नाही, उच्च जातीतील व्यक्ती सर्व सामान्य माणसाच्या तोंडावर मुततो, कुठे जबरदस्ती घाण पाणी पाजले जाते. जबाबदार असलेले लोक जगजाहीर खोट बोलुन बाजूला होतात, शिक्षा होताना गुन्हेगाराचा गुन्हा नाही तर जात बघून पाऊस उचलले जाते. पुस्तके वाचणारे लोक तुरुंगात तर भारतीय संरक्षण विभागाची गुप्त माहिती शत्रु राष्ट्राला देणाऱ्या वर देश द्रोहाचा खटला भरला जात नाही हे याच स्वतंत्र देशात घडले जाते. राष्ट्रभक्तीचा निव्वळ देखावा केला जातो परंतु राष्ट्रहिताच्या बाबी मात्र जोपासल्या जात नाहीत. देशाच्या ध्वजाला चक्रध्वज म्हणतात. परंतु सरळ सरळ तिरंगा म्हणून ध्वजाचा अवमान करणारे, देशाचे नाव इंडिया अर्थात भारत असे कलम क्रमांक एक मध्येच नमुद असताना ही देशाला वेगवेगळ्या नावाने संबोधने हा देशद्रोह नाही तर काय आहे? ध्वजाला तिरंगा म्हणून जाणीव पुर्वक एका रंगाला डावलले जाते, रंग हे कोणत्याही जाती धर्माशी संबधित नसेल तरीही ध्वजाला तिरंगा बोलणे हा राष्ट्रद्रोह आहेच पण हे मान्य करायला नैतिकता कुणाकडे आहे? भारतीय चक्रध्वज अर्थात भारतीय ध्वज याचे प्रमाण ३:२ आहे. झेंडा किती ही लहान किती ही मोठा बनवता येतो पण प्रमाण बदलता येत नाही. तिन रंगाच्या पट्या सारख्या आकाराच्या आणि मध्य भागी अशोक चक्र याच प्रमाणात असलेल्या वस्तु ला चक्रध्वज अर्थात देशाचे सर्वोच्च प्रतीक म्हणतो. परंतु बेगडी राष्ट्राभिमान दाखवण्यासाठी नुसत्या कपड्याच्या मुळ आकारात नसलेल्या पट्या लाऊन ध्वज होत नसतो तरीही त्याला ध्वज म्हणले जाते. या ध्वजाचा अवमान नाही का? थोडक्यात काय तर आजही भारतीय लोकांना भारतीय स्वातंत्र्य, भारतीय कायदा, भारतीय राष्ट्रीय प्रतीके व भारतीय कायदे याविषयी आपुलकी नाही. वर्षे भर आणि स्वातंत्र्य दिनीही ध्वजाचा, देशाच्या नावाचा अवमान होत असेल तर आम्ही स्वतंत्र दिवस व त्या मध्ये शहीद झालेल्या जवाणांविषयी किती गंभीर आहोत याची प्रचीती येते. स्वातंत्र्य दिन साजरा करताना शहीदांच्या रक्ताला आम्ही न्याय देऊ शकलो का?द्यायचा असेल तर तो कसा द्यावा? ब्रिटीशांचा विरोध ज्या उद्देशासाठी केला होता तो उद्देश पुर्णत्वास गेला का? आजही न्यायासाठी जनतेला रक्त सांडावे लागते, शेतकऱ्यांना गळ्याला फास लावावा लागतो. महिलांवर बलात्कार होऊन बलात्कारांचे जंगी स्वागत जर स्वतंत्र भारतात होत असेल तर देशाच्या स्वातंत्र्याचा फायदा सर्व सामान्य लोकांना कधी होणार? कोणताही दिवस साजरा करताना आपण समिक्षा करणे आवश्यक आहे म्हणून स्वातंत्र्य दिन साजरा करणे म्हणजे केवळ शहिदांना शाब्दिक आदरांजली वाहने नाही तर शहिदांच्या स्वप्नातील भारत उभा करणे होय. म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना आपण समिक्षा करून सत्य परिस्थिती मांडली पाहिजे, आणि जनतेची लुट, अन्याय अत्याचार थांबवून जनतेला शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, समान संधी निर्माण करून दिली पाहिजे. धर्माचा गर्व करणाऱ्यांना जागीच बंधने घालुन राष्ट्राभिमान जागृत करणाऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. स्वातंत्र्य दिन साजरा करताना जबाबदारी चे ओझे येत असते. पंच्चेहत्तर वर्षे होऊनही आमच्या मनात मी प्रथम भारतीय व मी अंतीम भारतीय ही भावना रूजली नसेल तर हि शोकांतिका आहे. आणि म्हणून स्वातंत्र्य दिन साजरा करताना वरिल बाबींचा जात धर्म पंथ वर्ण बाजुला सारुन राष्ट्र हित, राष्ट्रसन्मान, राष्ट्राभिमान निर्माण करणे आवश्यक आहे. फक्त भाषण देऊन स्वातंत्र्य दिन साजरा करता येत नाही. स्वातंत्र्यदिन साजरा करताना आपण समिक्षा सत्य मांडले पाहिजे. ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीमधून भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी ज्या शहिदांनी आपल्या जिवाचे दान दिले अशा सर्व ज्ञात अज्ञात शहिदांना आदरांजली.....

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगाव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

## देशाचा आज ७७वा

ऑनर देण्यात येईल, सकाळी ७.३० - पंतप्रधान ध्वजारोहण करतील, रक्षक नॅशनल सॅल्यूट देतील, बँडवर राष्ट्रगीत वाजवलं जाई, त्यानंतर २१ तोफांची सलामी, सकाळी ७.३३ - पंतप्रधानांचे देशाला संबोधन

**लाल किल्ल्यावरुन पंतप्रधान मोदींचे सलग दहावं भाषण**

लाल किल्ल्यावरुन पंतप्रधान मोदी सलग दहाव्यांदा देशाला संबोधित करणार आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीपूर्वी लाल किल्ल्यावरुन हे त्यांचं शेवटचं भाषण असेल. लाल किल्ल्यावर पोहोचल्यावर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री अजय भट्ट आणि संरक्षण सचिव गिरीधर अरमाने पंतप्रधानांचे स्वागत करतील. पंतप्रधानांच्या गार्ड ऑफ ऑनर तुकडीत लष्कर, हवाई दल आणि दिल्ली पोलिसांचे प्रत्येकी एक अधिकारी आणि प्रत्येकी २५ कर्मचारी आणि नौदलातील एक अधिकारी आणि २४ कर्मचारी असतील.

**लाल किल्ल्यासमोरील ज्ञानपथ फुलांनी सजवला**

लाल किल्ल्यासमोरील ज्ञानपथ फुलांनी सजवला जाईल आणि स्वातंत्र्य दिनानिमित्त ऋ-२० चे फलक लावले जातील. पंतप्रधान मोदी जिथून देशाला संबोधित करतात त्या किल्ल्याच्या तटबंदीवर कोणतीही मोठी सजावट केलेली नाही. सरकारने देशभरातून पीएम किसान योजनेच्या लाभार्थींसह सुमारे १,८०० विशेष पाहुण्यांना स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केलं आहे.यामध्ये सरपंच, शेतकरी उत्पादक संस्था योजनेशी संबंधित लोक, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतील सहभागी, प्रधानमंत्री कौशल विकास योजना, नवीन संसद भवनासह सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पातील बांधकाम कामगारांचा समावेश आहे. याशिवाय खादी कामगार, सीमावर्ती रस्त्यांचे बांधकाम, अमृत सरोवर, हर घर जल योजनेशी संबंधित लोक, प्राथमिक शाळेतील शिक्षक, परिचारिका आणि मच्छीमार हे देखील या कार्यक्रमामध्ये सहभागी होतील.

**देश अमर काळात प्रवेश करेल**

आज, स्वातंत्र्यदिनी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सोहळा संपन्न होईल आणि २०४७ पर्यंत भारताला विकसित देश बनवण्याचं स्वप्न साकार करण्यासाठी देश नव्या उमेदीने अमृत पर्वात प्रवेश करेल. पंतप्रधानांनी १२ मार्च २०२१ रोजी गुजरातमधील अहमदाबाद इथल्या साबरमती आश्रमातून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची सुरुवात केली होती.

**लाल किल्ल्याभोवती १०,००० सुरक्षा कर्मचारी तैनात**

देश आज ७७ वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहे. स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवरसुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. लाल किल्ल्याभोवती १०,००० हून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. यासोबतच १००० कॅमेरे, ड्रोनविरोधी यंत्रणाही बसवण्यात आली आहे.

## स्वातंत्र्यदिनी ९५४ पोलिसांना पदके;

पोलीस पदक प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या सेवेतील हे दुसरे शौर्य पदक आहे. याव्यतिरिक्त विशेष सेवेसाठी ८२ राष्ट्रपती पोलीस पदके आणि गुणवंत सेवेसाठी ६४२ पोलीस पदके देण्यात येणार आहेत.

राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक आणि शौर्य पोलीस पदक ही दोन्ही पदके जीवन आणि मालमत्ता वाचविणे, गुन्हेगारी रोखणे किंवा गुन्हेगारांना पकडणे यातील विशिष्ट शौर्याच्या आधारावर प्रदान केली जातात. पोलीस सेवेतील विशिष्ट विक्रमासाठी राष्ट्रपती पोलीस पदक दिले जाते. तसेच गुणवान सेवेसाठी पोलीस पदक साधनसंपत्ती आणि कर्तव्याची निष्ठेद्वारे वैशिष्ट्यकृत मौल्यवान सेवेसाठी प्रदान केले जाते.

## हिमाचल प्रदेश भूस्खलन ..

मुख्य रस्ते ठप्प झाले. अनेक घरं पडली. यामध्ये अजून २० हून अधिक लोक अडकले आहेत, मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो. शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. त्यामुळे राज्यात स्वातंत्र्य दिनानिमित्त कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित न करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.या दुर्घटनेनंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, भाजपाचे अध्यक्ष जेपी नड्डा, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासह राजकीय क्षेत्रातील अनेक नेत्यांचे फोन आले. त्यांनी राज्य सरकारला सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन दिलं आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी दिली.

## नबाव मलिक दीड वर्षानंतर

पूर्तता करण्याबाबत सुनावणी झाली. मुंबई सत्र न्यायालयानं ५० हजार रुपयांचा जामीन, साक्षीदारांना धमकावू नये, घराचा पत्ता आणि मोबाईल नंबर द्यावा, पासपोर्ट जमा करावा, मीडियाशी बोलू नये आणि गुन्हेगारी कृत्यात भाग घेऊ नये अशा अटीशर्थींवर मलिकांना जामीन मंजूर करण्यात आला.

## स्वातंत्र्यदिनी दिल्लीत

सांगितले की, दिल्ली पोलिसांना स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्याच्या सुरक्षेची जबाबदारी असल्याचा अभिमान आहे. संपूर्ण शहरात सुरक्षेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, स्वातंत्र्य दिनासाठी संपूर्ण शहरात तैनात करण्यात आलेल्या १०,००० अधिका-यांपैकी लाल किल्ला, दिवसाचे मुख्य ठिकाण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमासाठी मार्गावर असेल.

**(AI) वर आधारित सुरक्षा यंत्रणा**

तैनात करण्यात आलेल्या पथकांमध्ये अँटी सॅबोटेज इन्व्हेस्टिगेशन ॲक्सेस कंट्रोल आणि अँटी टेररिस्ट स्क्वाड्सचा समावेश आहे, असे एआय अधिकाऱ्यांनी सांगितले. याशिवाय आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आधारित चेहऱ्याची ओळख पटवणारी यंत्रणा देखील दहशतवादी घटकांवर लक्ष ठेवण्यासाठी आहे.

मध्यरात्रीपासून अवजड वाहनांना राजधानीत प्रवेश करण्यास मनाई केली आहे. तसेच, सीमेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि गुप्त माहिती गोळा करण्यासाठी जवान तैनात करण्यात आले आहेत. आवश्यक ठिकाणी वाहतूक निर्बंध लागू करण्यात आले असून नागरिकांना अद्ययावत करण्यासाठी वाहतूक सूचना नियमितपणे जारी केल्या जात आहेत.

या संदर्भात डीसीपी सागर सिंग कलसी म्हणाले की, गेल्या दोन महिन्यांपासून हॉटेल गेस्ट हाऊस, पेइंग गेस्ट हाऊस आणि लॉजमध्ये मोहिम राबवली जात आहे. संशयास्पद वस्तू आणि व्यक्तींची तपासणी करण्यासाठी शहरातील प्रत्येक चौकात दररोज १०० हून अधिक वाहनांची तपासणी करण्यात आली.

स्वातंत्र्यदिन सारंभाचा एक भाग म्हणून संरक्षण मंत्रालयाने MyGov पोर्टल वर १५ - २० ऑगस्ट दरम्यान ऑनलाईन सेल्फी स्पर्धा आयोजित केली आहे. जनतेने या १२ पैकी एक किंवा त्यापेक्षा जास्त ठिकाणी सेल्फी काढाव्यात आणि MyGov पोर्टल वर अपलोड करावे यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. ऑनलाईन सेल्फी स्पर्धेअंतर्गत प्रत्येक ठिकाणच्या एक, अशा एकूण बारा विजेत्यांची निवड करण्यात येईल. विजेत्याला प्रत्येकी १०,००० रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

## बुध्दवासी बळीराम सोनवणे यांचे निधन



अक्कलकोट : आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते बळीराम सोनवणे यांचे निधन झाले आहे. डॉ डि.वाय पाटील रुग्णालय चिंचवड येथे अखेर चा श्वास घेतला.दोन आठवड्यापुर्वी त्यांचे आपघात झाले होते. अआज अखेर त्याचे निधन झाले. ते हन्नूर ग्राम पंचायत सदस्य पत्रकार गौतम बाळशंकर याचे मामा होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पत्रकार संदीप महाजन यांच्या वरील हल्ल्याचा जाहीर निषेध

हल्लेखोरावर संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करा पत्रकार संघाची मागणी



वागदरी/एस.के.गायकवाड : जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांच्यावर खुनी हल्ला करणाऱ्या गावगुंडाचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालुका शाखा तुळजापूर व नळदुर्ग, जळकोट, अणदूर परिसरातील पत्रकारांच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे.

यासंदर्भात नळदुर्ग पोलीस ठाण्यात पत्रकार संघाच्या वतीने एक लेखी निवेदन देण्यात आले असून त्यात म्हटले आहे की, पाचोरा,जिल्हा जळगाव येथील पत्रकार संदीप महाजन यांनी एका घटनेची बातमी दिल्याने दुखावलेले स्थानिक आमदार किशोर पाटील यांनी फोनवरून पत्रकार संदीप महाजन यांना मारण्याची धमकी दिली व आमदारच्या गावगुंडानी पत्रकार संदीप महाजन यांच्यावर खुनी हल्ला केला. सदर घटना ही लोकशाहीला काळीमा फासणारी असून आभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदाआणनारी आहे. सदर निंदनीय घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून पत्रकार संदीप महाजन यांच्यावर हल्ला करणाऱ्या गांवगुडावर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार कारवाई करून त्याना कडक शासन करावे असी मागणी करण्यात येत आहे.

नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक याना देण्यात आलेल्या निवेदनावर, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मंत्रालयीन प्रतिनिधी प्रकाश गायकवाड, तुळजापूर तालुका अध्यक्ष अरूण लोखंडे, पत्रकार संघाचे एस.के.गायकवाड, किशोर धुमाळ, ईरफान काझी, संजय पिसे राजेंद्र स्वामी, सतिश राठोड सह पत्रकारांच्या सह्याआहेत.

# आजादी का अमृत महोत्सव: 'मेरी मिट्टी मेरा देश' उपक्रमांतर्गत सायकल रॅली संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने व पंढरपूर सायकल्स क्लब च्या वतीने आजादी का अमृत महोत्सव मेरी मिट्टी मेरा देश या उपक्रमांतर्गत आज छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. प्रांताधिकारी गजानन गुरव व उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांनी या रॅलीस झेंडा दाखवून सुरवात केली. छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, बाळासाहेब ठाकरे चौक, के बी पी कॉलेज, इंदिरा गांधी चौक, पंढरपूर अर्बन बँक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी भव्य सायकल रॅली काढण्यात आली होती. या सायकल रॅलीस प्रांताधिकारी अधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले,मुख्याधिकारी अरविंद माळी उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर,माहिती कार्यालयाचे अविनाश गरगडे, सायकल्स क्लबचे महेश भोसले, रेखा चंद्राव, सुरज अष्टेकर, आनंद शेटे, प्रशांत मोरे व इतर सायकल्स क्लबचे सदस्य व नगरपरिषद नगर परिषदेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास प्रांताधिकारी गजानन गुरव, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले. यावेळी नगर अभियंता नेताजी पवार, कर अधिकारी सुप्रिया शिंदे, कार्यालय अधीक्षक जांनबा कांबळे, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, दर्शन वेळापुरे, चेतन चव्हाण, चिदानंद सर्वगोड, अनिल अभंगराव हे उपस्थित होते .



# किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन व सॅनिटरी पॅड डिस्पोजेबल यंत्र मोफत वितरीत करण्यात येणार : महेश हिंडोळे

अक्कलकोट/प्रतिनिधी: ग्लेनमार्क लाइफ सायन्स मुंबईच्या वतीने नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड लातूर शाखा डॉ. मेथन फाउंडेशन सोलापूर व रोटरी क्लब लातूर होरायझन यांच्या संयुक्त विद्यमाने १८ ऑगस्ट रोजी अक्कलकोट तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालयांना सॅनिटरी पॅड डिस्पोजेबल यंत्र मोफत वितरित करण्यात येणार असल्याची माहिती समर्थ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश हिंडोळे यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.



सदरील कार्यक्रम १८ ऑगस्ट दुपारी १ वाजता लोकापुरे मल्टीपर्पज हॉल येथे किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन व यंत्र वितरण करण्यात येणार आहे.

सॅनिटरी पॅड डिस्पोजेबल यंत्र वितरित करीत असताना उपस्थित किशोरवयीन मुलींना माता भगिनींना शिक्षिकांनी व महिला कामगारांनी सॅनिटर पॅड वापर कसे आणि का करावे वापरलेले सॅनिटरी पॅड नष्ट का करावे यासाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाचे लाभ तालुक्यातील शाळा, महाविद्यालय, वसतिगृह व सामाजिक संस्थेच्या महिला व किशोरवयीन मुलींनी मोठ्या संख्येने घ्यावे असे त्यांनी सांगितले.

ज्या सामाजिक संस्थांना व शाळा महाविद्यालय, वस्तीग्रह व सॅनिटर पॅड डिस्पोजेबल यंत्र पाहिजे असल्यास त्यांनी आपल्या संस्थेच्या लेटर पॅड वर मागणी टाईप करून शाळा व संस्थेच्या मुख्याध्यापक प्राचार्य वस्तीग्रहाचे मुख्य अधिकारी यांचे स्वाक्षरी असलेली पत्र कार्यक्रमाच्या ठिकाणी दिल्यास त्यांना सदरील यंत्र मागणीप्रमाणे मोफत पुरवठा केला जाणार असल्याचे समर्थ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश हिंडोळे यांनी माहिती दिली आहे.

# वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार

सोलापूर : भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्याचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते मंगळवार दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ९ वाजून ५ मिनिटांनी नवीन जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगण सात रस्ता येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. तरी या समारंभास सर्व शासकीय विभाग प्रमुख, अधिकारी-कर्मचारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# गोवा येथे कृष्णा पराड 'समाज रत्न' पुरस्काराने सन्मानित



भिवंडी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील डोहळे येथील छोट्याश्या गावात जन्मलेले व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेले कृष्णा पराड यांना 'समाज रत्न' पुरस्काराने गोवा येथील एका कार्यक्रमात सन्मानित करण्यात आल्याने सर्वत्र त्याचें अभिनंदन होत आहे.

दिनांक ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन व ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन राष्ट्रीय अधिवेशना निमित्ताने रविंद्र भवन मडगाव गोवा येथील कार्यक्रमात ऑल इंडिया आदीवासी एम्प्लॉईज फेडरेशन महाराष्ट्राचे उपाध्यक्ष तिरु. कृष्णा पराड, यांना रमेश तडवडकर अध्यक्ष विधान सभा गोवा यांच्या उपस्थितीत व नामदार, गोविंद गावडे मंत्री, कला व सांस्कृतिक विभाग, गोवा यांच्या हस्ते समाज रत्न पुरस्कार -२०२३ ने सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार मिळाल्याचे समजताच विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, उद्योग, क्षेत्रातील मान्यवरांकडून कृष्णा पराड यांचे अभिनंदन होत आहे.

# कुष्ठरोग वसाहतीतील महिलांना साडी चोळी वाटप,

## समाजसेवक हनुमंत मोरे यांचा पंढरीत स्तुत्य उपक्रम

पंढरपूर/प्रतिनिधीः समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या कुष्ठरोगी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे. यात समाजसेवक हनुमंत मोरे यांच्यासारख्या धुरीनांची मदतही होत आहे. अधिक मासात पंढरपूरमधील कुष्ठरोगी वसाहतीतील महिलांना साडीचोळी देऊन त्यांचा सन्मान करण्याचे काम हनुमंत मोरे यांनी केले आहे. त्यांच्या या कामाचे कौतुक पंढरपूर परिसरात होत आहे.हनुमंत मोरे हे व्यक्तिमत्व पंढरपूर तालुक्यातील भोसे या गावचे आहे. समाजसेवेचा उपजत गुण त्यांच्याकडे असल्यामुळे, त्यांच्याकडून आजपर्यंत अनेक समाजकार्य घडली आहेत. गोरगरिबांसाठी रक्तदान शिबिरे,



गोरगरिबांना अन्न वाटप, खाऊ वाटप, याशिवाय दिवाळी निमित्त साखरेचे वाटपही त्यांच्याकडून दरवर्षीच होत असते. याशिवाय नागरिकांच्या मूलभूत समस्या अन्न, वस्त्र, निवारा या भागवण्यासाठीही त्यांनी आजपर्यंत मोठे काम केले आहे. समाजातील गरीब घरातील मुलींची लग्नकार्य स्वखर्चाने करून त्यांनी समाजापुढे आदर्श मांडला आहे. या त्यांच्या कामामुळेच ते समाजसेवक म्हणून पुढे आले आहेत.

सध्या अधिक मास चालू आहे. या मासात काहीतरी पुण्यकर्म करावे अशी प्रत्येकाची भावना असते. यानिमित्ताने अनेक जण देवदर्शनासाठी निघतात. कोणी अन्नदान करतात, समाजसेवक हनुमंत मोरे यांनी मात्र वेगळेच पुण्यकर्म केले आहे. पंढरपूर शहरातील गोपाळपूर नजीक असलेल्या कुष्ठरोगी वसाहतीमधील महिलांना साडीचोळी वाटप करून त्यांनी त्यांचा आशीर्वाद घेतला आहे. त्यांच्या या कृतीने त्यांचे या परिसरातून मोठे कौतुक होत आहे. स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे लोटली तरीही हा समाज समाज व्यवस्थेपासून दूरच आहे. या समाजास मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सरकारमार्फत सुरू आहे परंतु अपुऱ्या राजकीय इच्छाशक्तीमुळे हे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरत आहेत. हनुमंत मोरे यांच्यासारखे समाजसेवकच ही गोष्ट करू शकतात, यावर समाजातील जाणकारांचा मोठा विश्वास आहे.

# महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन च्या पश्चिम महाराष्ट्र खजिनदारपदी प्रशांत खलिपे

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका केमिस्ट परिवाराच्या वतीने भव्य सत्कार पंढरपूर - पंढरपूर तालुका केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत खलिपे यांची महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन च्या पश्चिम महाराष्ट्र खजिनदार पदी निवड करण्यात आली असून तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर तालुका केमिस्ट परिवार यांच्या वतीने भव्य सत्कार



नुकताच करण्यात आला. यावेळी क्रेनच्या सहाय्याने मोठा हार घालून डॉ.सादिक शेख यांच्यावतीने प्रशांत खलिपे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पंढरपूर तालुका केमिस्ट आसोसिएश चे जेष्ठ मार्गदशक सतिश आण्णा सादिगले, श्रीरंग बागल, गोवर्धन भट्टड, सुदेश व्होरा, किशोर निकते, कुलभूषण गांधी यांच्या हस्ते देखील सत्कार करण्यात आला.याप्रसंगी पंढरपूर तालुका केमिस्ट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व केमिस्ट महिला भगिनी,बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरच्या निवडीनंतर प्रशांत खलिपे यांचे पंढरपूरसह राज्यातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केलेले आहे.

# एम के फाउंडेशन च्या वतीने विजेचा शॉक लागून दोन्ही हात गमावलेल्या युवकास आर्थिक मदत



सोलापूर/प्रतिनिधी : इंगळगी दक्षिण सोलापूर येथील उमर जिलानी बागवान या युवकाचे वळसंग येथे इलेक्ट्रिशनचे काम करत असताना विजेचा धक्का लागल्यामुळे त्याला त्याचे दोन्ही हात गमवावे लागले होते.या घटनेने मुळ गावातून हळहळ व्यक्त होत होती.

तीन महिने हा युवक वैद्यकीय खर्चाच्या अडचणीत असून त्या युवकाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न उद्भवू लागला आहे, ही बातमी सागर सिमेंटचे मुख्य व्यवस्थापक तथा एम के फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांना समजताच आज त्यांच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन करून कुटुंबाला धीर देत त्या युवकाच्या वैद्यकीय खर्चास हातभार म्हणून आर्थिक मदत करण्यात आली.

शासनाकडे पाठपुरावा करून अजुन शक्य ती मदत मिळत असेल तर त्यासाठी नक्कीच प्रयत्न करा अशी मागणी ग्रामस्थांनी महादेव कोगनुरे यांच्याकडे केली. याला प्रतिसाद देत नक्कीच प्रयत्न करू व भविष्यकाळात अजून काय मदत लागली तर फाउंडेशन च्या वतीने शक्य ती मदत करू असे प्रतिपादन महादेव कोगनुरे यांनी दिले.

यावेळी त्या युवकाचे वडील जिलानी बागवान, गावचे सरपंच सौ.लक्ष्मी वळसंगे , नूर अहमद बागवान, मौलाली शेख, उस्मान बागवान, सोमानंद फताटे, विद्याधर वळसंगे, मेहबूब शेख, रेवण्या स्वामी, धनराज वळसंगे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विरमाता श्रीमती शांताबाई बनसोडे यांच्या हस्ते शहीद किर्ती चक्र नायक यशवंत बनसोडे यांच्या शिला फलकाचे अनावरण



वागदरी/एस.के.गायकवाड : माझा देश माझी माती या अभियानांतर्गत नगर परिषद नळदुर्ग यांच्या वतीने आज केंद्रीय प्राथमिक शाळा नळदुर्ग येथील प्रांगणात किर्ती चक्र शहीद नायक यशवंत मारुती बनसोडे यांच्या शीला फलकाचे अनावरण विरमाता श्रीमती शांताबाई मारुती बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर परिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक विनायक अहंकारी, केंद्रिय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भास्कर मस्के हे होते.प्रारंभी शालेय विद्यार्थ्यांच्या स्वागत गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते किर्तीचक्र नायब शहीद यशवंत बनसोडे यांच्या मातोश्री वीरमाता शांताबाई मारुती बनसोडे,शहीद राम सादु गायकवाड यांची वीरपत्नी श्रीमती लक्ष्मीबाई गायकवाड सह सर्व माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये विनयकुमार पंडीत, बाळासाहेब जाधव, बळी दस, शिवानंद खद्दे, दशरथ जाधव, प्रकाश मोर्डे, शिवशंकर हत्ते, विश्वनाथ हत्ते, कृष्णा माने, सुरेश सुरवसे, विठल जाधव,सिद्धराम मुळे इत्यादींचा मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व प्रमाण पत्र देवून सत्कार करून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्गचे सचिव मारुती बनसोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरज गायकवाड यांनी केले. यावेळी न.प.चे सर्व कर्मचारी, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आज देशभरात ७७ वा स्वातंत्र्यदिन साजरा केला जात आहे. या निमित्त देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उजनी धरणावर तिरंगी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देणेस शिशु विकास मंदिर कटीबध्द : महेश इंगळे

## वटवृक्ष देवस्थानकडून विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्यांचे वाटप

### वटवृक्ष देवस्थानच्या श्री स्वामी समर्थ शिशू विकास मंदिराचे उपक्रम



अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे तत्कालीन माजी चेअरमन कै.कल्याणराव बाळासाहेब इंगळे यांनी २१ वर्षांपूर्वी अक्कलकोट शहरातील सर्वसामान्य पालकांची पाल्ये शिक्षणापासून वंचित राहू नये यानिमीत्ताने गोरगरीब घराण्यातील बालकांची शिक्षणाची गरज ओळखून देवस्थानच्या वतीने संस्थेच्या विठ्ठल मंदिर येथे श्री स्वामी समर्थ शिशु विकास मंदिर या नावे शिशु विकास मंदिराची स्थापना करून बालकांना मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. आज या विद्या मंदिरात जवळपास २०० बालक मोफत शिक्षणाचा लाभ घेत आहेत. आधुनिक काळातील इंग्रजी शिक्षणाची गरज ओळखुन गेल्या १० वर्षांपासून इंग्रजी विषयही शिकविण्यात येत आहे. याकरिता आमच्या पाठीशी श्री स्वामी समर्थांचे आशीर्वाद व प्रेरणा आहेत. या प्रेरणेतून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणेस देवस्थानचे हे श्री स्वामी समर्थ शिशुविकास मंदिर कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी केले. देवस्थान संचलित श्री स्वामी समर्थ शिशु विकास मंदिर येथे ७६ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभुमीवर बालकांकरिता सालाबादाप्रमाणे यंदाही मोफत गणवेश व आवश्यक ते सर्व शैक्षणिक साहित्यांचे वाटप, शिक्षिकांना साड्यांचे वाटप देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे व सचिव आत्माराम घाटगे यांचे हस्ते वाटप करण्यात आले. या प्रसंगी महेश इंगळे बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या, विठ्ठलाच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुख्याध्यापिका स्वाती गाडे जाधव यांनी केले, तर आभार सचिव आत्माराम घाटगे यांनी मानले. याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, मुख्याध्यापिका स्वाती गाडे, शिक्षिका शशिकला मडीखांबे, वंदना शिर्के, जयश्री माने, गिरीश पवार, संजय पवार, सागर गोंडाळ, व विद्यार्थ्यांचे पालक आदी उपस्थित होते.

# विभाजन विभिषिका स्मृतिदिनाचे औचित्य साधून भाजपाच्यावतीने आ.कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली मशाल मूक मोर्चा




अक्कलकोट/प्रतिनिधीः येथे विभाजन विभिषिका स्मृतिदिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्षाच्या वतीने ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिर ते ए वन चौकापर्यंत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाच्या वतीने मशाल मूक मोर्चा काढण्यात आला.

सदरील मशाल मूक रॅली अक्कलकोटचे ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिर ते बस स्थानक विजय चौक कारंजा चौक मेन रोड सावरकर चौक सेंट्रल चौक राजे फत्तेसिंह चौक कमला राजे चौक ए वन चौकापर्यंत रॅली काढून ए वन चौकातील स्तंभास अभिवादन करून रॅलीचे समारोप करण्यात आला.

या रॅलीमध्ये खासदार डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामीजी आमदार सचिन कल्याणशेट्टी भाजपा तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड शहर अध्यक्ष शिवशरण जोजन दुधनी बाजार समितीचे सभापती सातलिंग परमशेट्टी महेश दयानंद बिडवे कांतू धनशेट्टी यशवंत धोंगडे रियाज सय्यद राजकुमार बंदीछोडे सुधीर मचाले सरपंच बसवराज निम्मे महेश पाटील शंकर भांजी बसवराज होऊदे राजकुमार झिंगाडे रमेश कापसे परमेश्वर यादवाड अनिल पाटील बंटी राठोड शंकर उणदे रामचंद्र होनराव मल्लिनाथ भासगी निरंजन सिद्धाराम तडवळे धनंजय गाढवे शब्बीर जमादार अशोक बिराजदार नन्नू कोरबू मोहसीन सैपन शेख रशीद किस्तके मुजमिन नाकेदार गुरुनाथ माळी नागराज कलशेट्टी रुद्रया स्वामी आदीसह शेकडो भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# महादेव कोळी स्मशान भूमी येथे वृक्षारोपण



पानमंगरुळ/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ येथील महादेव कोळी समाज व धनगर समाज स्मशानभूमी येथे समाज बांधवांच्या हस्ते चिंच, वड, कडुलिंब, पिंपळ, आवळा इतर स्थानिक प्रजातीच्या ७५ वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाला श्री मंगलेश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने वृक्षारोपण साठी लागणारे खड्डे व रोप देण्यात आले व महादेव तेन्नळ्ळी यांनी स्मशानभूमी येथे स्वखर्चातून बोअरवेल व वृक्षारोपण केलेल्या रोपांना दोन वर्ष पाणी पुरवठा करणार असल्याचे सांगितले. यावेळी सेवानिवृत्त गटविकास अधिकारी महादेव बेळ्ळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबादास सुणगार, पीएसआय राजेंद्र बोरोटीकर, मा. सरपंच लक्ष्मण पुजारी, शिवशंकर जमादार, कोळी समाजा अध्यक्ष बसवराज सुणगार, चंद्रकांत करजगीकर, आण्णाराव बळूरगी, रामा जंबगी, किटप्पा बळुरगी, बाळू मुली, चंद्रकांत पुजारी, महादेव तेनळ्ळी, भिमू सुणगार, सर्जेराव माशाळे, अशोक बळुरगी, सिध्दू मुली, बाबू सुणगार, अंबण्णा मुली, राजू बादोले, भिमराव सुलगित्ती, कल्लप्पा कोळी, दत्ता सतारे, शिवानंद माशाळे, अशोक सोलापूरे, रवि बनसोडे, बाबूलाल हत्तूर, राम सुणगार, लक्ष्मण सुणगार, रफिक नदाफ, नागनाथ बळुरगी, पंडित उडासे, महादेव माशाळे, रमेश बळुरगी, शेकण्णा सुणगार, रेवणू बळुरगी, गणपती होटगी व मलकण्णा करजगीकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

# हन्नुर ग्रामपंचायतच्या वतीने आजी माजी सैनिकांचा सत्कार



अक्कलकोट/ गौतम बाळशंकर : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी समाप्ती वर्ष, मेरी मिट्टी मेरा देश या अभियाना अंतर्गत हनूर गावातील आजी – माजी सैनिकांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच सागर (दादा )कल्याणशेट्टी होते, प्रमुख पाहुणे सरपंच सोनाली तलवार, यांच्या प्रमुख उपस्थिती हा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहाने संपन्न झाला.माजी सैनिक राजकुमार भरमशेट्टी, त्यांच्या सुविध्य पत्नी जयश्री राजकुमार भरमशेट्टी, माजी सैनिक महादेव हेगडे त्यांच्या सुविद्या पत्नी प्राजक्ता महादेव हेगडे, यांचे प्रमुख उपस्थिती होती.त्याचबरोबर, जम्मू काश्मीर येथे कार्यरत असणारे, सैनिक शरणाप्पा धर्मसाले व , लक्ष्मण घोडके, हे सैनिक अनुउपस्थित राहिल्यामुळे, त्यांचे मातापित्याने हा सत्कार स्वीकारला आहे.भारतीय नेव्ही मध्ये कार्यरत असणारे रविकांत अर्जुन जळकोटे यांचा सत्कार त्यांचे माता पिता.अर्जुन जळकोटे, रेखा जळकोटे यानी स्वीकारला, पुणे येथे आर्मी मध्ये कार्यत असणारे प्रशांत चंद्रकांत धर्मसाले , यांचा सत्कार त्यांचे पिता चंद्रकांत धर्मसाले यांनी स्विकारला. ए.पी.आय पोलीस अधिकारी ,बसवराज जकीकोरे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी, ग्रामपंचायत सदस्य गौतम बाळशंकर यांनी, वीर जवान व सैनिकांच्या कार्याची माहिती देऊन.उपस्थिताचे मन जिंकले.यावेळी ग्रामविकास अधिकारी सी एल थोरात, ग्रामपंचायत सदस्य शैलेश पाटील ,श्रीकांत बकरे मुक्ताबाई ढगे ,शांताबाई फासगे, मुख्याध्यापक विलास बिराजदार सर जिल्हा परिषद मुख्याध्यापक श्रीकांत राठोड सर, डॉक्टर वैजनाथ बिराजदार परिचारिका जाधव मॅडम अंगणवाडी सेविका पत्की बाई, नया बाळशंकर, ज्योती बाळशंकर, आशा वर्कर, ज्योती कोरे, मायाव्वा घोडके, मनीषा बाळशंकर, लक्ष्मण पुजारी लक्ष्मण बाळशंकर तुळशीराम इरवाडकर ,वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

आधी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य गौतम बाळशंकर,यांनी केले तर , आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी सी एल थोरात यांनी केले.

# पानमंगरुळ येथे सेवानिवृत्त अधिकारी बेळ्ळे, सुणगार व बोरोटीकर यांचा सत्कार



पानमंगरुळ/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळचे कोळी समाजाचे सुपूत्र गटविकास अधिकारी महादेव बेळ्ळे, सोलापूर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरिक्षक अंबादास सुणगार, सांगोला पोलीस स्टेशनचे पीएसआय राजेंद्र बोरोटीकर या तीनही अधिकारी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याबद्दल महादेव कोळी समाजाच्या वतीने मानाचा फेटा, मायेची शाल, हार व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच लक्ष्मण पुजारी हे होते.

यावेळी मा. सरपंच शिवशंकर जमादार, कोळी समाजा अध्यक्ष बसवराज सुणगार, चंद्रकांत करजगीकर, आण्णाराव बळूरगी, रामा जंबगी, किटप्पा बळुरगी, बाळू मुली, चंद्रकांत पुजारी, महादेव तेनळ्ळी, भिमू सुणगार, सर्जेराव माशाळे, अशोक बळुरगी, सिध्दू मुली, बाबू सुणगार, अंबण्णा मुली, राजू बादोले, भिमराव सुलगित्ती, कल्लप्पा कोळी, दत्ता सतारे, शिवानंद माशाळे, अशोक सोलापूरे, रवि बनसोडे, बाबूलाल हत्तूर, राम सुणगार, लक्ष्मण सुणगार, रफिक नदाफ, नागनाथ बळुरगी, पंडित उडासे, महादेव माशाळे, रमेश बळुरगी, शेकण्णा सुणगार, रेवणू बळुरगी आदी समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव जंबगी यांनी केले तर आभार सर्जेराव माशाळे यांनी मानले.

# २५–३० किलोमीटरचा प्रवास ते कुटुंबाचा उदरनिर्वाह..

## कळंबोलीत दत्ता सोमा टोले वयाच्या ६५व्या वर्षी देखील जगण्यासाठी लढाई सुरूच....

अतुल गोडसे/कळंबोली : आजकाल शिक्षण करून देखील नोकऱ्या नाहीत. राज्यात असे अनेक विद्यार्थी आहेत ज्यांनी उच्च शिक्षण घेऊन देखील बेरोजगार म्हणून समाजात वावरत आहेत. आणि ज्यांना नोकरी मिळालेले आहे ते तुटपुंज्या पगारावर काम करत आहेत. मात्र गेल्या वीस वर्षापासून



कळंबोली मधील दत्ता सोमा टोले वय ६५ वर्ष असून अजून देखील त्याच जिद्दीने उदरनिर्वाहासाठी रोज २५ ते ३० किलोमीटरचा प्रवास करत आहेत. दैनंदिन जीवनात आपल्याला अश्या अनेक व्यक्ती दिसून येत असतील जे हातात गोणी घेऊन प्लॅस्टिक आणि बाटल्या गोळा करत असतात. त्यांची वेशभूषा आणि त्यांचे राहणीमान पाहून आपण त्यांच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करत असतो.पण त्यांच्या याच कामामुळे त्यांचं घर चालत आहे. कळंबोलीतील दत्ता टोले हे देखील तेच काम करत आहेत. दिवसाला पंधरा ते वीस किलो प्लास्टिक गोळा करण्यासाठी घरातून सकाळी पाच वाजता त्यांचा हा प्रवास चालू होत असून रात्री नऊ वाजेपर्यंत ते हे काम करतात. महिनाभर प्लॅस्टिक जमा करून पनवेल मधील तक्का येतील भंगारवाल्याला ते विकतात. प्रति किलो २० रुपये या भावाने हा प्लॅस्टिक विकला जातो. त्यातूनच गेले वीस वर्ष ते आपल्या संसाराचा गाडा हाकत आहेत. सध्या त्यांची घरची परिस्थिती चांगली आहे. दत्ता हे त्याच्या आई, पत्नी आणि दोन मुलांसह कळंबोली गावात राहतात. मुलगी एमजीएम कॉलेजमध्ये बी फार्मसी शिकत आहे. आणि मुलगा देखील एमजीएम रुग्णालयामध्ये मध्ये वॉर्डबॉयच काम करत आहे.

# शेतीच्या पाणी वापराच्या पाणीपट्टी वाढीविरोधात शिवसेना मैदानात..

पंढरपुर/प्रतिनिधीः सरकारने नुकत्याच केलेल्या शेतीच्या पाणी वापराच्या पाणीपट्टी वाढीविरोधात आता शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक झाला आहे. आज पंढरपूर तहसील कार्यालयात तहसीलदार श्री.सुशिल बेल्हेकर यांना या बाबत शिवसेनेच्या वतिने निवेदन देण्यात आले.यावेळी बोलताना शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख संजय घोडके म्हणाले की, उपसा पद्धतीने पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी यापूर्वी १२० रुपये प्रति हेक्टरप्रमाणे वसुली केली जात होती. कॅनॉल व इतर ठिकाणाहुन पाणी घेणाऱ्यांना हेक्टरी १२०० रुपये व त्यावर २० टक्के स्थानिक सेसने पाणीपट्टी वसूल करण्यात येणार असल्याचा फतवाच सुलतानी सरकारने काढला आहे. सुलतानी सरकारने शेतकऱ्यावर जुलुम चालविल्याची भावना देखील घोडके यांनी व्यक्त केली..

यावेळी बोलताना युवासेनेचे युवानेते रणजित बागल म्हणाले की, जाहीरातबाज सरकार शेतकऱ्यांच्या उत्पन्ना पेक्षा उत्पादन खर्च वाढविण्यात सरकार आग्रही आहे, सरकारने शेतकऱ्यांना अडचणी आणण्यात कोणतीही कसुर ठेवली नाही. पाणीपट्टीच्या दरामध्ये दहा पट्टीने वाढ केल्याचे म्हटले आहे. रब्बी हंगामात सिंचनासाठी पाण्याची मागणी जास्त असते. प्रकल्पांवरून रब्बी हंगामासाठी दोन ते तीन व उन्हाळी हंगामासाठी पाच ते सहावेळा उपलब्ध पाणी पुरविणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात हंगामनिहाय अपेक्षीत पाणी पुरविले जात नाही त्यासाठी पाणीपट्टी आकारली जाते.आधी पाणीपट्टीनुसार करवसुली केली जात होती आता हेक्टरनिहाय दर ठरविले गेले. पाणीपट्टीत वाढ व त्याला स्थानिक सेसची जोड देण्याचा फतवा शासनाने काढला आहे. वीज दरात भरमसाठ वाढ, भारनियमन, विजेचा तुटवडा अशा असंख्य समस्येने शेतकरी त्रस्त आहे. त्यात गेल्या काही वर्षापासुन शेतकरी नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असुन या काळात एवढी वाढ करणे म्हणजे शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याचे युवासेनेचे रणजित बागल यांनी बोलताना सांगितले.

यावेळी महर्षी वाल्मिकी संघाचे सामाजिक कार्यकर्ते गणेश अंकुशराव यांनी बोलताना आपण या आंदोलनात शिवसेनेसोबत आहोत, व आगामी काळात या मागणीसाठी लढा उभारावा यावेळी आम्ही सोबत असु असे सांगुन पाठिंबा व्यक्त केला..

यावेळी शिवसेनेचे विभागप्रमुख उत्तम कराळे,विभागप्रमुख उमेश काळे,बंडु घोडके,गौसपाक आत्तार,पितांबर कापसे,एस.शेख,स्वप्निल गावडे,कपिल पाटील,डॉ अनिल क्षीरसागर,प्रकाश बंडगर,अर्जुन भोसले,औदुंबर चव्हाण,पांडुरंग काटकर,परशु नायकुडे,अप्पा गायकवाड, विजय जाधव, रविंद्र विलास शिंदे,संजय पवार,महेश यादव,अजित शेवतकर,महेश कांबळे,शिवाजी काळे,युनुस मुलाणी,महावीर हाके,शंकर सावंत,ज्योतीराम सावंत,नाना कोळी,आप्पा कदम,राजु सुर्यवंशी,अर्जुन भोसले,परशुराम पेहे यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक उपस्थित होते..